# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०५/२०२५ (रविवार)**

---

## अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांवर सावनेर पोलीसांनी केली कारवाई

पो.स्टे. सावनेर :— दिनांक १६/०५/२०२५ रोजी श्री अनिल मस्के , सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांना मुखबिरव्दारे विश्वसनीयमाहीती प्राप्त झाली कि नागपुर वरून सावनेर कडे स्विफ्ट कार क्रमांक, एम पी ४० झेड ई ७७९६ गाडी मध्ये काही इमम अवैधरित्या शस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे उद्देशाने जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री अनिल मस्के यांनी सावनेर पोलीसांचे पथक कारवाई कामी रवाना केले. पोलीसांनी मौजा **माळेगाव बस स्टॅन्ड नागपुर सावनेर हायवे** येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान स्विफ्ट कार क्रमांक, एम पी ४० झेड ई ७७९६ मिळुन आलयाने सदर वाहन थांबवुन त्याची पंचासमक्ष पाहणी केली. नमुद वाहनामधे चालकासह अजुन दोन ईसम बसुन होते. त्यांना नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १. कृष्णगोपाल व्दारकाप्रसाद दुबे (चालक), अभिषेक गोविंदप्रसाद प्रजापती, ३, अजय विश्वनाथसिंह राजपूत हे तीन्ही रा वार्ड नं, १८ राजपूत कॉलनी ,अयोध्या नगर, नाईस ॲकॅडमी चे समोर ,विदिशा सावनेर, जि नागपुर अशी माहीती** प्राप्त झाली. नमुद वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली १. एक काळया रंगाच्या कव्हर मध्ये लोखंडी गुप्ती, २. काळया रंगाची टॉय पिस्तोल ३. दोन लाल रंगाचे खाली केस, ४. अर्थिंग तार, ५.एक ब्राउन रंगाची बेसबॉल सिट स्टिक ,आरोपीतांच्या ताब्यातुन ४ ॲड्रॉईड मोंबाईल आणि स्विफ्ट कार क्रमांक, एम पी ४० झेड ई ७७९६ असा एकुण कि. २,४३,३१० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांना शस्त्र परवान्या बाबत विचारपुस केली असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नव्हता.

**नमुद आरोपीतांविरूध्द पोस्टे सावनेर  येथे कलम ४,६,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अधिनियमअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेंशन अरोली:—** दिनांक १७/०५/२०२५ रोजी अरोली पोलीसांनी गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बोलोरो पिकअप मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे दोन कारवाई केल्या.

**कारवाई क्रं १ :—** मौजा वाकेश्वर शिवारात देवसुकळी  ते वाकेशवर येथे रोडवर बोलेरो पिकअप क्रमांक  एम एच ४० सी एम १२४८ या वाहनाचा चालक लोकांच्या जिवीतास धोक होईल अशा प्रकारे निष्काळजी पणाने वाहन चालवितांना दिसुन आला. वाहन थांबवीले असता त्यातील चालक आणिा त्याचा साथीदार अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले.पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात म्हशी दिसुन आल्या.गाडीतील जनावरांना कोणत्याही प्रकारची चारापण्याची सोय न करता ,दोरखंडाने बांधुन,निर्दयतेने कोंबुन जनारावरांची  वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले.  पोलीसांनी पंचासमक्ष **एक  बोलेरो पिकअप क्रमांक एम एच ४० सी एम १२४८ किंमती ४,००,०००/— रूपये. व ५ म्हशी किंमती  १,५०,००० /— रूपये असा एकुण किंमती ५,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं** २. वरील प्रमाणे कारवाई करून पोलीस परत येत असतांना देवसुकळी कडुन वाकेश्वर कडे बोलोरे पिकअप क्रमांक एम एच ३५ के ३२९३ हे वाहन  संशयीत रित्या येताना दिसले असता पोलीसांनी वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात म्हशी दिसुन आल्या. चालक **प्रविण बाबुलाल राणे , वय ३२ वर्ष रा.डोंगरला ता तुमसर, जि. भंडारा** हा मिळुन आला. त्याला जनावरांच्या वाहतुकीबाबत कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतेही कागदपत्रे नव्हती.तसेच नमुद वाहन हे त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. गाडीतील जनावरांना कोणत्याही प्रकारची चारापण्याची सोय न करता ,दोरखंडाने बांधुन,निर्दयतेने कोंबुन जनारावरांची  वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले.  पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन **एक बोलोरो पिकअप एम. एच. ३५ के**

**३२९३ किंमती ४,००,०००/— रूपये. व ४ म्हशी , १ हेला किंमती १,५०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ५,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाई पोलीसांनी एकुण १० जनावरांची सुटका केली असुन जनावरे आणि २ वाहने अशा एकुण किंमती ११,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीतांवर कलम २८१,१२५ भान्यासं कलम प्राण्याचां छळ अधिनियमा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.**

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १८/०५/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **मोहदी दळवी रोडवर स्मशानभुमीच्या बाजुला** काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) राजु रामेश्वर कारवाईत, वय ३५ वर्षे,रा. वार्ड क्र ३ नरखेड २) राकेश मधुकरराव गायकवाड, वय ३६ वर्षे, रा. वार्ड क्र १४ नरखेड, ३) हनुमंत बाबुलाल इंगळे,

वय ४६ वर्षे , रा. तास भिवापुर ४) कल्पेश वामनराव वैदय, वय ४२ वर्षे, वार्ड क्र २ नरखेड ,५) हर्षल पिलाजी नारनवरे, वय २७ वर्षे,रा वार्ड क्र ०५ नरखेड, हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते , आरोपीतांचे अंगझडतीतुन ३९०० /— रूपये,डावावरून ११००/— रूपये, एक मोटार सायकल बजाज व्ही १२ क्रमांक एम एच ४० बि एच . ३३५५ किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण कि ५५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या देशी,विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ८ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण ३७०२०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक १७/०५/२०२५** रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत विविध पोलीस स्टेशन देवलापार, कुही, उमरेड ,सावनेर, खापा, कन्हान अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू असा एकुण ३७,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ८ आरोपीतांवर महा. दारूबंदी कायदयान्वये ८ गुन्हे दाखल केले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**